महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

**पोलीस उप-आयुक्त**
**वाहतुक शाखा यांचे कार्यालय, बंगला नं ६ येरवडा,**
**पोस्ट ऑफीस जवळ,पुणे-४११००६**
**फोन नं. :०२०-२६६८८०००** email - dcptraffic.pune@nic.in

पुणे शहर वाहतूक पोलीस
PUNE CITY TRAFFIC POLICE

जा.क्रं.पोउआ/वाहतूक/वाचक/प्रे.नो./४५४९/२०२४ दिनांक :-२९/०६/२०२४

## प्रेसनोट

दिनांक २९/०६/२०२४ रोजी पहाटे ०५:३० ते ०६:३० वा दरम्यान पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत कोंढवा पोलीस स्टेशनच्या हद्दीत एक अल्पवयीन मुलगा पाण्याचा टँकर चालवित असताना गंभीर अपघात झाला सदर अपघातामध्ये तीन व्यक्ती जखमी झाल्या आहेत. सदर गंभीर अपघाताबाबत कोंढवा पोलीस स्टेशनमध्ये विधिसंघर्षित बालकाविरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर ७८०/२०२४, भा. द. वि. कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ मोटार वाहन कायदा कलम १८४, ३ (१)/१८१ अन्वये दखलपात्र गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच पाण्याचा टँकर मालक व टँकर चालविणारा विधिसंघर्षित बालकाचे वडील यांचेविरुध्द गुन्हा रजिस्टर नंबर ७८१/२०२४, बालन्याय अधिनियम २०१५ चे कलम ७५, ७९, मोटार वाहन कायदा कलम १८८ चे कलम ४ (१)/१८१, ५/१८०, १९९ (ए), बालकामगार अधिनियम कलम १४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**मोटार वाहन सुधारणा कायदा २०१९ चे कलम १९९अ (१) मध्ये अल्पवयीन बालकास गाडी चालवण्यास दिल्यास सदर अल्पवयीन चालकाचे पालक व सदर वाहनाचा मालक यांना या प्रकरणी दोषी ठरवुन त्यांना ३ वर्षापर्यंत कारावास व २५,०००/- रुपये पर्यंतचा दंड केला जाऊ शकतो व मोटार वाहन सुधारणा कायदा २०१९ चे कलम १९९अ (४) मध्ये अल्पवयीन चालकाने वाहन चालवुन अपराध केला तर त्या अल्पवयीन चालकाने गुन्ह्यासाठी वापरलेल्या वाहनाची नोंदणी ही १२ महिन्यांकरीता रद्द करता येतो तसेच मोटार वाहन सुधारणा कायदा २०१९ चे कलम १९९अ (५) मध्ये असा अपराध करणारा अल्पवयीन वाहन चालकास वयाची २५ वर्षांपर्यत वाहन चालवण्याचा परवाना मिळण्यास पात्र असणार नाही.** या प्रकरणात मोटार वाहन सुधारणा कायदा २०१९ चे कलम १९९अ (४) चे तरतुदीनुसार अल्पवयीन वाहन चालकास वाहन चालविण्यास दिल्याबद्दल टँकर वाहन मालकाच्या टँकर वाहनाची नोंदणी मोटार वाहन कायदा कलम १९९ (अ) (४) मधील तरतुदीनुसार १२ महिन्यांकरीता रद्द करणे बाबतचा प्रस्ताव कोंढवा वाहतुक विभागाकडुन पोलीस उप आयुक्त वाहतूक शाखा कार्यालयास पाठवला होता तो पोलीस उप आयुक्त वाहतुक शाखा यांचे मार्फतीने प्रादेशिक परिवहन विभाग कार्यालयास पाठविण्यात आला आहे. त्याचप्रमाणे अल्पवयीन बालकास व्यावसायीक वाहन चालविण्यास दिल्यास सदर बाब बालकामगार अधिनियम प्रमाणे अपराध आहे. **बालकामगार अधिनियम कलम १४ अन्वये कोणत्याही बालकास कोणत्याही व्यवसायात किंवा प्रक्रिया उद्योगात कामावर ठेवेल अशा व्यक्तीस ६ महिन्यांपेक्षा कमी नसेल परंतु २ वर्षांपर्यंत वाढवता येईल इतक्या कारावासाचे शिक्षेस पात्र असेल.**

अशाप्रकारे अल्पवयीन वाहन चालकांनी वाहन चालविल्यास अल्पवयीन वाहनचालकांवर, अल्पवयीन वाहन चालकाचे पालकांवर तसेच वाहनमालकांवर मोटार वाहन कायदयातील कलमान्वये कठोर कारवाई करण्यात येत असते. याद्वारे पुणे शहरातील सर्व सुज्ञ नागरिकांना आवाहन करण्यात येते की आपले अल्पवयीन मुलांना कोणत्याही प्रकारचे वाहन चालविण्यास देवु नये जेणेकरुन रस्त्यावरील सर्व सामान्य नागरीकांचे जिवीतास धोका पोहचणार नाही तसेच कोणीही अल्पवयीन बालकांना कामावर ठेवुन बालकामगार अधिनियमाचे उल्लंघन करु नये.

(रोहिदास पवार)
पोलीस उप आयुक्त
वाहतूक शाखा पुणे शहर